# प्रादेशिक वृत्त विभाग

## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

## मंगळवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२४

## ठळक बातम्या

1. **केंद्र सरकारनं तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या शंभर दिवसांत पंधरा लाख कोटी रुपयांच्या विविध विकासयोजनांना मंजूरी दिली- गृहमंत्री अमित शाह यांची माहिती.**
2. **'स्वच्छता ही सेवा' अभियानाला आज पासून देशव्यापी सुरवात.**
3. **“वात्सल्य” योजनेच्या राष्ट्रीय कार्यक्रमात नागपूर जिल्हयाचा सहभाग राहणार, उद्या 18 सप्टेंबरला नागपूरची मुलं अर्थमंत्र्यांना थेट ऐकणार.**
4. **गणेशोत्सवाची आज सांगता, आवडत्या बाप्पाला पुढच्या वर्षी येण्याचं आमंत्रण देत वाजत गाजत दिला जातोय निरोप.**

****

### शंभर दिवस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला आज शंभर दिवस पूर्ण झाले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं देशाची सुरक्षा व्यवस्था मजबूत केली असून सुरक्षित भारत निर्माण करण्यास मदत केली आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं. सरकारनं तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या शंभर दिवसांत पंधरा लाख कोटी रुपयांच्या विविध विकास योजनांना मंजूरी दिली आहे आणि काम सुरु केलं आहे, तसंच पायाभूत सुविधांसाठी तीन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरु केले आहेत, असं शहा यांनी सांगितलं. मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारनं आराखडा तयार केला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. मणिपूरमधला हिंसाचार वांशिक स्वरुपाचा आहे, आणि तो रोखण्यासाठी सरकार कुकी आणि मैतेई या दोन्ही समुदायांसोबत चर्चा करतआहे, असं त्यांनी सांगितलं. तिथली परिस्थिती लवकरच पूर्वपदावर येईल अशी आशा ही त्यांनी व्यक्त केली.

## विश्वकर्मा जयंती

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा जयंती निमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये प्रधानमंत्र्यांनी निर्मिती आणि बांधकाम क्षेत्रातल्या कारागीरांना अभिवादन केलं. विकसित आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यात त्यांचं योगदान अमूल्य असल्याचं मोदी म्हणाले.

## जल सप्ताह

राष्ट्रपती द्रौपदीमुर्मू यांनी आज नवी दिल्ली इथं आठव्या भारतीय जल सप्ताहाचं उद्घाटन केलं. भारतीय प्राचीन धर्मग्रंथांनी हजारो वर्षांपूर्वी जलसंधारणाचा उल्लेख केला असल्याचं मुर्मू यांनी यावेळी बोलताना नमूद केलं. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवादरम्यान अमृतसरोवरांची निर्मिती करण्यात आली आणि अनेक जलकुंभांचं पुनरुज्जीवन करण्यात आल्याचा उल्लेख राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात केला. चार दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात चाळीस देशांतल्या दोनशे प्रतिनिधींसह सुमारे चार हजार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात, जलक्षेत्रात काम करणारे शंभरहून अधिक स्टार्टअप्स आपापल्या संकल्पना मांडतील.

## आतिषी

आम आदमी पार्टीच्या नेत्या आतिशी यांची पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी आज निवड करण्यात आली आहे. आतिशी या दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री असतील. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची दोन दिवसांपूर्वी जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली होती. केजरीवाल यांनी आज नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांना भेटून पदाचा राजीनामा सुपूर्द केला.

## स्वच्छता ही सेवा

देशभरात आजपासून ‘स्वच्छता ही सेवा अभियान २०२४’ ला सुरुवात झाली. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत हे अभियान सुरू असेल. स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता ही यंदाच्या अभियानाची संकल्पना आहे. यंदाच्या अभियानासाठी संपूर्ण समाजाचा सहभाग असावाया दृष्टीने श्रमदान मोहिमा, जन भागिदारी आणि सफाई मित्र ते तीनप्रमुख स्तंभ म्हणून निश्चित केले गेले आहेत. या अभियाना अंतर्गत पर्यटनस्थळं, सार्वजनिक इमारती, व्यापारीक्षेत्र, पाणवठे, प्राणिसंग्रहालयं,अभयारण्ये, सामुदायिक आणि सार्वजनिक स्वच्छतागृहअशा विविध ठिकाणी स्वच्छताविषयक

श्रमदान आणि सामूहिक मोहिमा राबवल्या जाणार आहेत.या अभियानाच्या निमित्तानं आज ठिकठिकाणी स्वच्छताविषयक शपथ ग्रहण कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं. याअंतर्गत राज्यात विविध रेल्वे स्थानकं, आकाशवाणी नागपूरसह इतर केंद्र, तसंच केंद्रसरकारच्या अखत्यारितील विविध कार्यालयांमध्ये स्वच्छताविषयक शपथ दिली गेली.

## एकनाथ शिंदे

पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्र यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या कार्यासाठी वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमच्या वतीनं मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. एनसीपीए इथं 20 देशातील प्रतिनिधींच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय बांबू दिवसाचे औचित्य साधत उद्या 18 सप्टेंबर रोजी हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम' हे अन्नसुरक्षा विषयी जागतिक नेत्यांना चर्चा करण्यासाठीचे व्यासपीठ आहे. जागतिक कृषी मंचचे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंज हे आहेत. कृषी क्षेत्रातील प्रगतीच्या अनुषंगाने भविष्यातील धोरण आणि जागतिक स्तरांवर होत असलेल्या कामांची दखल घेऊन जागतिक पुरस्कारासाठी जगातील विविध देशातून नामांकन विचारात घेण्यात येतात.

## वात्सल्य

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या अल्पवयीन मुलांसाठीच्या “वात्सल्य” नावाच्या नव्या पेन्शन योजनेची सुरूवात 18 सप्टेंबर रोजी होत आहे. नवी दिल्ली येथून होणाऱ्या राष्ट्रीय शुभारंभ सोहळ्यात नागपूर जिल्हयाचा ऑनलाईन सहभाग आहे. देशातील मोजक्या जिल्हयामध्ये नागपूरचा सहभाग निश्चित झाला असून हा कार्यक्रम नागपूर येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स,बेलतरोडी येथे होणार आहे. नागपूर जिल्हयाच्या अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मोहित गेडाम यांनी दिलेल्या माहितीनुसार स्कूल ऑफ स्कॉलर्स शाळा, बेलतरोडी नागपूर येथे 40 विद्यार्थीआणि 40 पालकांच्या सहभागात जिल्हा या राष्ट्रीय शुभारंभ कार्यक्रमात सहभागी होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन आणि अन्य मान्यवर याकार्यक्रमाला दिल्ली येथून संबोधित करणार आहेत. 18 सप्टेंबर रोजी दुपारी 1:30 ते4.00 या काळामध्ये हा कार्यक्रम होणार असून नागपूर येथील बँक ऑफ इंडिया या

अग्रणीबँकेमार्फत हे आयोजन करण्यात आले आहे. वात्सल्य ही शून्य ते 18वयोगटातील बालकांसाठी नवीन पेन्शन योजना आहे. पालक आपल्या मुलांच्या नावे यापेन्शन योजनेत महिन्याला किमान 1 हजार तर वर्षभरात कमाल अमर्यादीत रुपये जमा करूशकतो. मुलाच्या 18 वर्षापर्यंत हे खाते पालक चालवतील त्यानंतर मुलांच्या नावे हेखाते होणार आहे. मुलगा 18 वर्षाचा झाला की, हे खातेअखंडपणे नियमित NPS खात्यात किंवा NPSनसलेल्या योजनेत रुपांतरीत केले जाऊ शकते. थोडक्यात बालकाच्या भविष्यासाठी राष्ट्रीय पेन्शन योजनेचे खाते शून्य ते 18 या वयोगटात उघडण्याची ही योजना आहे. मुलांसाठी दीर्घकालनी बचत आणि आर्थिक नियोजनाला यामुळे हातभार लागणार आहे. भारतीय नागरीक असणे ही या योजनेची प्राथमिक अट असून नागरिकांच्या सेवानिवृत्तीच्या गरजापूर्ण करण्यासाठी यातून आर्थिक सुरक्षा निर्माण केली जाते.

## गणपती विसर्जन

आज अनंतचतुर्दशी. आज १० दिवस सुरु असलेल्या गणेशोत्सवाची सांगता होत असून सार्वजनिक मंडळांसह घरगुती गणपती मूर्तींना विसर्जित करण्यात येत आहे. लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी येण्याचं आमंत्रण देत वाजत गाजत निरोप देण्यात येत आहे. नागपूरच्या राजाच्या विसर्जनाच्या शाही मिरवणुकीला आज सकाळीच सुरुवात झाली. याशिवाय विविध मंडळांचे गणपती आणि घरगुती गणपती देखील प्रशासनाने केलेल्या व्यवस्थेच्या ठिकाणी विसर्जित होत आहेत. यंदा पर्यावरणपुरक विसर्जनावर भर असून तलाव, विहरी आणि पाणवठे इथं मूर्ती शिरवायला बंदी आहे. वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि शहरातील मानाचा समजला जाणारा जय शिवशंकर गणेश मंडळाच्या गणेशाची पूजा केली. विधान परिषदेच्या आमदार भावनागवळी यांनी देखील वाशीम मध्ये पुष्प उधळून कार्यकर्त्यांसह मिरवणुकीमध्ये ढोलवादनात सहभाग घेतला. श्री गणेशाचे विसर्जन इको फ्रेंडली पद्धतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत त्यामुळे गोंदिया जिल्ह्यात बऱ्याच लोकांनी आपल्या घरघुती गणपती बापाचे विसर्जन आपल्या घरीच पाण्याच्या टपात केले आहेत तर जलकुंडातील माती देखील शेतात किंवा बगीच्या मध्ये टाकण्यात येणार आहे तर निर्माल्यापासून खत तयार करण्यात येईल.

## हवामान

विदर्भात नागपूर सह अमरावती यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आज काही ठिकाणी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तर वर्धा, गडचिरोली अकोला, बुलढाणा, आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केलाय. नागपुरात आज सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. दरम्यान उद्या देखील विदर्भात सर्वत्र पावसाळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता असून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी, पूर्व विदर्भात तुरळक ठिकाणी, तर पश्चिम विदर्भात विरळ स्वरूपात हजेरी लावू शकतात.

## आशिया हॉकी चॅम्पियन्स

भारत आणि चीन यांच्यातील आशिया हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफी 2024 च्या अंतिम सामन्यात भारताने चीनला १-० असं पराभूत करून पाचव्यांदा आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी आपल्या नावे केली.

******